## संक्षिप्त

### भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी आज निवड चाचणी

**धुळे :** सामाजिक न्याय विभागाच्या निर्णयान्वये फक्त जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील १८ ते २५ वर्षे वयोगटातील युवकांसाठी सैन्य व पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी गुरुवारी (ता. १९) सकाळी अकराला पोलिस कवायत मैदानावर निवड चाचणी होणार आहे, असे सहाय्यक आयुक्त हर्षदा बडगुजर यांनी कळविले आहे. यात ४० उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी २० जुलैपासून पुढे ९० दिवसांचा राहील. मोफत गणवेश देण्यात येईल. हे प्रशिक्षण अमरावती येथे होईल.

# खानदेशात ८० टक्के पेरणी उरकली

## कापसाची लागवड सर्वाधिक, पेरणीची टक्केवारी आणखी वाढणार

**जळगाव (प्रतिनिधी) :** खानदेशात जवळपास ८० टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण होत आली आहे. पुढील १० - १२ दिवसांत आणखी पेरणी होईल. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा स्थिती बरी असून, कापसाची लागवड सर्वाधिक क्षेत्रावर असेल, हे स्पष्ट झाले आहे.

जळगाव जिल्ह्यातील ७ लाख ६५ हजार हेक्टरपैकी ७५ टक्के क्षेत्रावर, धुळे जिल्ह्यातील ४ लाख २० हजार हेक्टरपैकी ८५ टक्के क्षेत्रावर, तर नंदुरबारमधील २ लाख ७३ हजार हेक्टरपैकी ८५ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

मागील वर्षी जुलैच्या मध्यापर्यंत फक्त ६५ टक्के क्षेत्रावर खानदेशात पेरणी झाली होती. यंदा पेरणी होऊन पिकांची उगवणही बऱ्यापैकी आहे. सोयाबीन, कडधान्ये, ज्वारीचे पीक वाढीच्या अवस्थेत आहे. या आठवड्यात दिलासादायक पाऊस झाल्याने चित्र चांगले आहे. पूर्वहंगामी व कोरडवाहू कापसाचे पिकही बरे असून, कुठेही पीक मोडण्याची वेळ यंदा आलेली नसल्याची माहिती मिळाली.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा व धडगाव, धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा व साक्री आणि जळगाव जिल्ह्यातील बोदवड, मुक्ताईनगर, रावेर मध्ये काही भागात पेरणी झालेली नाही. कापूस लागवडीस उशीर झाल्याने पीक पुढे चांगले येईल की नाही, असा प्रश्न या शेतकऱ्यांसमोर आहे. उर्वरित क्षेत्रात बाजरी, तुरीची पेरणी करण्याची तयारी काही शेतकऱ्यांनी केली आहे. तर काही शेतकरी ताग पेरणीच्या लगबगीत आहेत. यंदा फक्त पाच ते आठ टक्के क्षेत्र नापेर राहील, असा अंदाज कृषी विभागाचा आहे.

**जिल्हानिहाय पीक लागवड (हेक्टरमध्ये)**

| | |
|---|---|
| जळगाव | कापूस - सुमारे ४ लाख ३० हजार, ज्वारी - सुमारे १ लाख, मका - सुमारे १० ते १२ हजार, कडधान्ये - २ लाख, सोयाबीन - सुमारे २४ हजार |
| धुळे | कापूस - २ लाख, यापाठोपाठ कडधान्ये, तृणधान्ये व गळीत धान्याची पेरणी. |
| नंदुरबार | कापूस - सुमारे १ लाख त्यापाठोपाठ ज्वारी, कडधान्याची पेरणी झाली आहे. |

> आमच्या भागात पेरणी फारशी राहिलेली नाही. परंतु पाऊस जोरदार नाही. पीकस्थिती बरी आहे. कापसाची लागवड यंदाही अधिक दिसत आहे.
>
> **– रोहित पाटील,**
> शेतकरी, वडछील, ता. शहादा



अकलूज, जि. सोलापूर : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.

### विजेसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांचे शासनाकडे साकडे

**धुळे (प्रतिनिधी) :** शेतकऱ्यांच्या विकासासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या पूरक ठरतील. चांगले उद्योग ग्रामीण भागात उभे राहतील, परंतु विजेची व्यवस्था, निधी नसल्याने या कंपन्यांचे उद्योग सुरू होऊ शकलेले नाहीत. आत्माच्या माध्यमातून निधी मिळाला, पण त्यात नेमकी विजेसाठी तरतूद नसल्याने जिल्हा प्रशासनाने विजेसंबंधी कार्यवाही करावी, अशी मागणी धुळे जिल्हा शेतकरी उत्पादक महासंघाचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्याकडे केली. पाटील व इतर शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सहकाऱ्यांनी नुकतीच जिल्हाधिकारी यांची भेट घेतली व आपले विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले. शेतकरी उत्पादक कंपन्या या शेतकऱ्यांच्या व शेतीसाठी आहेत. त्यांना घरगुती दरात वीज उपलब्ध व्हावी. वीज जोडणीसाठीचा खर्च जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दिला जावा. यामुळे या कंपन्यांचे काम सुरू होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

सकाळ ॲग्रोवन — आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर — प्रायोजित

ॲग्रोवन संवाद

'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक

**शुक्रवार, २० जुलै २०१८**

**जळगाव**
**विषय - केळी खत व्यवस्थापन**
**वक्ते - धीरज नेहेते** (विषय विशेषतज्ज्ञ, उदयानविद्या, केव्हीके, पाल)
**स्थळ -** कोरपावली वि.का.वि. सहकारी सोसायटी, कोरपावली, ता. यावल, जि. जळगाव, **वेळ -** सकाळी ९.३० वा.

**धुळे**
**विषय - कापूस लागवड तंत्रज्ञान व बोंड आळी नियंत्रण**
**वक्ते - श्री. जगदीश काथेपुरी** (कृषी विद्यावेत्ता, केव्हीके, धुळे)
**डॉ. पंकज पाटील** (कृषीशास्त्रज्ञ, पीकसंरक्षण, केव्हीके, धुळे)
**स्थळ -** विठ्ठल रुक्मिणी मंदिर चौक ग्रामपंचायत कार्यालयजवळ, मु. पो. शिरढाणे, ता. जि. धुळे, **वेळ -** सायं. ६ वा.

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

### ग्रामरोजगार सेवकांचा आज नागपूरला मोर्चा

**धुळे :** ग्रामरोजगार सेवकांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता व्हावी, यासाठी ग्रामरोजगार सेवक संघटनेतर्फे नागपूर विधानभवनावर गुरूवारी (ता.१९) मोर्चा काढण्यात येणार आहे. ग्रामरोजगार सेवकांना अर्धवेळऐवजी पूर्णवेळ कर्मचारी करण्यात यावे, उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे किमान वेतन धोरण लागू करावे, आदी मागण्यांसाठी हा मोर्चा निघेल. त्यात ग्रामरोजगार सेवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा खानदेश ग्रामरोजगार सेवक संघटनेचे कार्याध्यक्ष वसंत पाटील यांनी केले.

# जळगावात पोलिस बंदोबस्तात दूध वाहतूक

## खानदेशात विविध ठिकाणी आंदोलन; वारकऱ्यांना दुधाचे मोफत वाटप

**जळगाव (प्रतिनिधी) :** शहरातील राष्ट्रीय महामार्ग, औरंगाबाद महामार्गावरून दूध वाहतूक करणाऱ्या वाहनांना जिल्हा पोलिस दलातर्फे संपूर्ण सुरक्षा पुरविण्यात येत असल्याने तूर्तास तरी दुधाच्या वाहनांवरील संकट टळले आहे. दूध आंदोलनाच्या नावाने कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश जिल्हा पोलिस अधीक्षक दत्तात्रेय कराळे यांच्यातर्फे देण्यात आले आहे.

**पिंगाणे येथे दुधाचे वाहन अडविले**

अन्न वाया घालवू नये, असा विचार सांगत पिंगाणे (ता. शहादा) येथील शेतकऱ्यांनी दूध आंदोलनात भाग घेतला. गावाजवळ दुधाची गाडी अडवून नागेश्वर मंदिरात दुधाचा अभिषेक केला. उर्वरित दूध गरजू लोकांना मोफत दिले. दुधाला पाच रुपये अनुदान मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष वसंत पटेल, नथ्थू पाटील, गणेश पाटील, जिल्हा युवा अध्यक्ष सचिन पाटील आदींनी सांगितले.

**कापडणे, धनूर येथेही आंदोलन**

धुळे तालुक्यातील कापडणे व धनूर येथेही दूध आंदोलन झाले. आंदोलकांनी ५०० लिटर दुधाचे मोफत वितरण केले. कापडणेयेथील एका दूध उत्पादक संस्थेचे दूध शेतकऱ्यांनी शहराकडे जाऊ दिले नाही. त्याचे मोफत वितरण गावात करण्यात आले. या वेळी शेतकऱ्यांनी दूध दरवाढीची मागणी केली. धनूर गावातील पन्नास वारकरी राज्य परिवहन मंडळाच्या बसने पंढरपूरकडे मार्गस्थ झाले. तत्पूर्वी त्यांना शेतकऱ्यांनी दुधाचे मोफत वितरण केले. सरपंच भटू पाटील, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष नवल पाटील, उपसरपंच कविता मनोज पाटील, विष्णू पाटील, शरद बोरसे, धनराज पाटील, विजय वाघ, विश्वनाथ पाटील आदींनी आंदोलनात भाग घेतला.